 *नि.फौ.ख.क्र.२३०५/२०२१*

सरकार वि. सुरेंद्र वगैरे
निशाणी क्र.२१

**<u>सरकारतर्फे साक्षदार क्र.१ यांची शपथेवर सरतपासणी सुरु</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव : सखाराम एकनाथ कांबळे
वय : ३० वर्षे,
धंदा : पी.एस.आय. पो.ठाणे अजनी,
राहणार : बजरंग नगर, प्लॉट नं.३०४, सिध्देश्वर हॉलजवळ, नागपूर.

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे सहायक सरकारी वकिल श्रीमती गोगे यांचा पुकारा केला असता ते गैरहजर</u>**

**<u>सरतपास न्यायालयामार्फत स्वत:</u>**

१. दिनांक ०१.०१.२०२० रोजी पासून मी पोलीस स्टेशन अजनी येथे पोलीस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहे. दिनांक ०९.०२.२०२१ रोजी मी ठाणे अंमलदार म्हणून कार्यरत होतो. सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास पौर्णिमा विलास मस्के ह्या फिर्याद देण्यासाठी पोलीस ठाण्यात आल्या होत्या. मी त्यांनी सांगीतल्याप्रमाणे फिर्याद नोंदवून घेतली व माझ्या निर्देशाप्रमाणे मदतनिसांनी सदर फिर्याद लिहली. मला आता दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे, त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. फिर्यादीने माझ्यासमक्ष सही केलेली असल्याने त्यांची सही मी ओळखतो. मला आता दाखविण्यात आलेला छापील प्रथम खबर तीच आहे, त्यावर माझी व फिर्यादीची सही आहे. फिर्यादीने माझ्यासमक्ष सही केलेली असल्याने त्यांची सही मी ओळखतो.

२. फिर्यादवरून मी गुन्हा नोंद केला. त्यानंतर मी दुस-या दिवशी घटनास्थळावर गेलो. मी सरकारी वाहनाने गेलो होतो. घटनास्थळ हे काशीनगर, सम्राट अशोक कॉलनी, बौध्दविहाराजवळ होते. तेव्हा घटनास्थळावर मला विटेचा तुकडा पडलेला दिसला. सदर घटनास्थळ हे फिर्यादीने दाखविले. सदर घटनास्थळ पाहतांना दोन पंच जे घटनास्थळ पाहतांना हजर होते व ते त्या भागातीलच होते, त्यांच्यासमक्ष मी पाहणी केली. घटनास्थळावर सापडलेला विटेचा तुकडा जप्त केला व

घटनास्थळ पंचनामा तयार केला. पंचनामा तयार करतांना घटनास्थळाचा नकाशाही काढला. आता मला दाखविलेला घटनास्थळ पंचनामा तोच आहे, त्यावर माझी सही आहे. पंचनामा तयार केल्यानंतर मी पंचाच्याही सहया घेतल्या व त्यानंतर मी सुध्दा सही केली. पंचानी माझ्यासमक्ष सहया केल्याने त्या सहया मी ओळखतो. घटनास्थळाचा मजकुर बरोबर आहे. घटनास्थळ पंचनाम्यास **नि.क्र.२२** देण्यात येते. त्यानंतर पोलीस ठाण्यात जावून मी सदर विटेचा तुकडा मुद्येमाल गृहात जमा केला.

३. सदर गुन्हयाच्या पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल विलास मेश्राम यांना सुपूर्द केला.

**उलट तपासणी आरोपीतर्फे वकील श्री. पराग उके यांच्यामार्फत**

(त्यांचे ज्युनिअर ॲड. जतीन चौकीकर यांच्या विनंतीवरून उलटतपास काही काळासाठी तहकुब)

समक्ष

(कि.का. शाह)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दि.१६.०७.२०२२

**उलट तपासणी आरोपीतर्फे वकील श्री. पराग उके यांच्यामार्फत पुन्हा शपथेवर सरू**

४. फिर्यादीने जी तक्रार दिली ती मौखीक दिली. फिर्यादीने जी फिर्याद दिली त्याबददल मला वैयक्तीक माहिती नाही, हे म्हणणे बरोबर नाही. मी फिर्यादवर समक्ष म्हणून सही केली, हे म्हणणे बरोबर आहे. फिर्यादवर समक्ष म्हणून तेव्हाच सही करता येते जेव्हा ती स्वत: नोंदवलेली असते, हे म्हणणे बरोबर आहे. फिर्याद मी स्वत: लिहीलेली नाही, हे म्हणणे बरोबर आहे. छापील प्रथम खबर अहवालाशी माझा संबंध आहे. सदर छापील प्रथम खबर अहवालामध्ये फिर्यादीने लेखी फिर्याद दिली असा उल्लेख आहे, हे म्हणणे बरोबर आहे. ती लेखी फिर्याद न्यायालयात दाखल नाही, हे म्हणणे बरोबर आहे.

५. सदर घटनेची माहिती मला रात्री ११.३० वाजता मिळाली. सदर गुन्हा नोंद दुस-या दिवशी दिनांक १०.०२.२०२१ रोजी सकाळी ३.३० वाजता झाला, हे

म्हणणे बरोबर आहे. छापील प्रथम खबर अहवालातील कॉलम नं.८ मध्ये फिर्याद देण्यास उशिर झाला असल्यास त्याचे कारणे नमूद करणे आवश्यक आहे, हे म्हणणे बरोबर आहे. सदर कॉलम नं.८ मध्ये कुठलेही कारण नमुद केलेले नाही, हे म्हणणे बरोबर आहे.

६. फिर्यादीचा पती व आरोपी सुरेंद्र हे सख्खे भाउ आहेत, हे म्हणणे बरोबर आहे. सदर दोन्ही भावामध्ये वडीलोपार्जीत मिळकतीमध्ये वाटणी झाली असल्याबददल माहिती नाही. माझ्या तपासामध्ये फिर्यादी व आरोपींनी एकमेकांविरूध्द अनेकदा पोलीस ठाण्यामध्ये येवून फिर्याद दिल्या असल्याबददल मला माहिती झाले नाही. मी घटनास्थळ पंचनामा तपासी अधिकारी म्हणून केलेला नाही. मी घटनास्थळ पंचनाम्यावर तपासी अधिकारी म्हणून सही केली आहे, हे म्हणणे बरोबर आहे.

७. तपासादरम्यान जी वस्तु जप्त करतात ती वस्तु ताबडतोब मालखान्यात जमा करण्यात येते, हे म्हणणे बरोबर आहे. मुद्येमाल हा मुद्येमालगृहात जमा करण्यात येतो, हे म्हणणे बरोबर आहे. मुद्येमालगृहात जमा केलेल्या मुद्येमालाची नोंद रजिस्टरला घेण्यात येते, हे म्हणणे बरोबर आहे. मी मुद्येमालगृह रजिस्टर बघीतले असता तशी नोंद दिसलेली नाही. मी घटनास्थळावरून कुठलाही मुद्येमाल जप्त केलेला नसल्याने तशी नोंद चार्जशिटमध्ये नाही, हे म्हणणे बरोबर नाही.

८. मी फिर्यादीला वा इतर जखमींना स्वत: मेडीकलला पाठविले नाही, हे म्हणणे बरोबर आहे. मी स्वत: विटेचा तुकडा डॉक्टरांकडे अभिप्राय घेण्यास पाठविला नाही, हे म्हणणे बरोबर आहे. सदर विटेचा तुकडा मी सी.ए. कडे तपासणीस पाठविलेला नाही. मी विटेचा तुकडा फिर्यादीकडून ओळख पंचनामा करून घेतलेला नाही. सदर विटेच्या तुकडयाशी सदर मॅटरशी काहीही संबंध नाही, हे म्हणणे बरोबर नाही.

९. फिर्यादी किती वाजेपर्यंत हॉस्पीटलला होती, हे मला माहिती नाही. मी घटनास्थळ पंचनामा करतांना विटेचे मोजमाप नमूद केलेले नाही. तपास एका अधिका-याकडून दुस-या अधिका-याकडे सुपूर्द करतांना सिनीअर पी.आय. तशी नोंद स्टेशन डायरीला करतात. मी फिर्याद स्वत: नोंदवून घेतलेली नसल्याने घटना

काय घडली याची मला प्रत्यक्ष माहिती नाही, हे म्हणणे बरोबर नाही. पोलीस ठाण्यात एक कॉग्नीझेबल केसेसचे रजिस्टर मेन्टेन करण्यात येतो. ज्या पोलीस ठाण्यात २०० पेक्षा अधिक कॉग्नीझेबल केसेस नोंदविण्यात येतात त्या पोलीस ठाण्यात दोन कॉग्नीझेबल रजिस्टर मेन्टेन करण्यात येते याची मला माहिती नाही. मी कॉग्नीझेबल रजिस्टरला नोंद घेतली होती, त्याची प्रत मी तपासी अधिका-याला दिली नाही.

१०. मला घटनास्थळावर फिर्यादीच्या घराचे बांधकाम सुरू असल्याचे दिसले, हे म्हणणे बरोबर नाही. घटनास्थळावर फिर्यादीच्या घराचे बांधकाम सुरू असल्याने बांधकाम साहित्य, विटा, गिट्टी, लोखंडी सळी असे सर्व साहित्य रस्त्यावर पडलेले होते, हे म्हणणे बरोबर नाही. फिर्यादीच्या अगोदर आरोपीने फिर्यादीविरूध्द एन.सी. दाखल केली होती, हे म्हणणे बरोबर आहे. मी त्या एन.सी. ची पडताळणी केली नव्हती. फिर्यादी व जख्मी यांच्यामध्ये बाचाबाची झाल्याने ते सदर गिट्टी, रेती याच्यावर पडल्याने त्याला लागल्याचे एन.सी. मध्ये नमूद असल्याचे मला माहिती नाही. मी फिर्यादीला खोटी फिर्याद दाखल करण्यास मदत केल्याने फिर्याद दाखल करण्यास वेळ लागला, हे म्हणणे बरोबर नाही. न्यायालयात मुद्येमाल दाखल नाही, हे म्हणणे बरोबर आहे.

११. घटनास्थळ पंचनामा पोलीस ठाण्यात बसून तयार केला, हे म्हणणे बरोबर नाही. मी खोटी फिर्याद आरोपीच्या विरोधात जाणूनबूजून नोंदवून घेतली, हे म्हणणे बरोबर नाही. फिर्यादमध्ये नमूद असल्याप्रमाणे कुठलीही घटना घडलेली नसून मी आज खोटी साक्ष देत आहे, हे म्हणणे बरोबर नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

वा.दा.ब.असे कबुल केले
समक्ष

(कि.का. शाह)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दि.१६.०७.२०२२